# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.02.2026** **वार:शनिवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते नवीन सरकारी कार्यालयीन संकुल - सेवा तीर्थचं उद्घाटन. नवीन कार्यालयातून अनेक निर्णय निर्गमित
2. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याचा समारोप
3. जगातील भू-राजकीय परिस्थिती पाहता भारतानं स्वतंत्र भूमिका घेणं आवश्यक असल्याचं सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांचं मत
4. सन 2024 चे यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार जाहीर आणि
5. राज्यस्तरीय दृष्टिहीन क्रिकेट स्पर्धेत विदर्भाचा संघ अजिंक्य

**पंतप्रधान-सेवातीर्थ**

नवी दिल्लीत उभारण्यात आलेल्या सेवा तीर्थ या कार्यालयीन संकुलाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल करण्यात आलं. या कार्यालयीन संकुलात पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबीनेट सचिवालय यांच्यासह अनेक प्रमुख मंत्रालयांची कार्यालयं आहेत. या नवीन संकुलातील कार्यालयाच्या उद्घाटनानंतर लगेचच, पंतप्रधानांनी अनेक निर्णय घोषित केले. सेवातीर्थ आणि कर्त्तव्य भवन जनहितार्थ सिद्ध ठरतील असा विश्वास व्यक्त करताना ते म्हणाले...

***मैं गर्व के साथ कह सकता हूं कि सेवा तीर्थ और कर्तव्य भवन जैसे नए परिसर, भारत की, जनता की आकांक्षाओं को पूरा करने के लिए बने हैं। यहां से जो फैसले होंगे वह किसी महराज की सोच को नहीं 140 करोड़ देशवासियों की अपेक्षाओं को अगे बढ़ने का आधार हो बनेंगे। इसी अमृत भावना के साथ आज मैं यह सेवा तीर्थ एक कर्तव्य भवन भारत की जनता को समर्पित कर रहा हूं।***

पंतप्रधान राहत योजनेअंतर्गत, अपघातग्रस्तांना दीड लाख रुपयांपर्यंत रोख-विरहित उपचार, मार्च 2029 पर्यंत लखपती दिदींचं लक्ष्य दुप्पट करून सहा कोटी रुपये करणं, कृषी पायाभूत सुविधा निधी दुप्पट करून दोन लाख कोटी रुपये करणं हे निर्णय घेतानाच, द्वितीय स्टार्टअप इंडिया फंडासाठी 10 हजार कोटी रुपयांच्या निधीला पंतप्रधानांनी मंजुरी दिली आहे. शेतकरी, महिला, युवक आणि असुरक्षित नागरिकांसाठी महत्त्वाच्या निर्णयांशी संबंधित महत्त्वाच्या दस्तावेजांवर पंतप्रधानांनी स्वाक्षरी केली.

**संसद-अधिवेशन**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याचा काल समारोप झाला. पहिल्या टप्प्याच्या कालच्या अखेरच्या दिवशी लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून गदारोळ केल्यामुळं कामकाज स्थगित करण्यात आलं. अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याचं कामकाज 9 मार्चला सुरु होणार आहे. लोकसभेत काल प्रश्नोत्तराच्या तासात विरोधकांनी गदारोळ घातल्यामुळे, कामकाज आधी दुपारी 12 वाजेपर्यंत आणि त्यानंतर 9 मार्चपर्यंत स्थगित करण्यात आलं.

**गहू-साखर निर्यात**

केंद्र सरकारनं 25 लाख मेट्रिक टन गहू आणि 5 लाख मेट्रिक टन गव्हाच्या इतर उत्पादनांच्या निर्यातीला मान्यता दिली आहे. यामुळे देशांतर्गत बाजारपेठेला स्थैर्य मिळेल आणि उत्पादकांना लाभदायक परतावा मिळेल अशी आशा आहे. सध्याची

उपलब्धता आणि किंमतीच्या परिस्थितीचं व्यापक मूल्यांकन केल्यानंतर विचारपूर्वक हा निर्णय हा घेण्यात आल्याचं सरकारतर्फे सांगण्यात आलं. यासोबतच, साखरेची निर्यात सुलभ करण्यासाठी, सरकारनं वर्तमान साखर हंगामादरम्यान इच्छुक साखर कारखान्यांना अतिरिक्त 5 लाख मेट्रिक टन साखर निर्यात करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. इच्छुक साखर कारखान्यांनी वाटप केलेल्या प्रमाणापैकी किमान 70 टक्के साखरेची 30 जून पर्यंत निर्यात केल्यास, त्यांना अतिरिक्त 5 एलएमटी साखर निर्यात करता येईल.

**रेडीओ दिवस**

जागतिक रेडिओ दिनानिमित्त, आकाशवाणी आणि युनेस्को यांच्याद्वारे काल, छत्तीसगडची राजधानी रायपूरमध्ये राष्ट्रीय स्तरावरील विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं. आकाशवाणी हे माहिती, शिक्षण आणि निखळ मनोरंजन प्रसारित करण्यासाठी एक शक्तिशाली माध्यम असून, ग्रामीण भाग आणि शेतकऱ्यांकरिता रेडीओ विशेष भूमिका बजावतो असं प्रतिपादन साई यांनी यावेळी बोलताना केलं. युनेस्कोचे संवाद आणि माहिती विभागाचे प्रादेशिक सल्लागार हज्जाझ माले, आकाशवाणीचे महासंचालक राजीव जैन यावेळी उपस्थित होते. 23 भाषा आणि 182 बोलीभाषांच्या माध्यमातून आकाशवाणी देशाच्या दुर्गम भागात पोहोचली असून, तिने, देशाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपत, समाजातील सर्व घटकांना देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीशी जोडण्याचं काम केलं असल्याचं जैन यावेळी म्हणाले.

**सीडीएस**

जगातील भुराजकीय परिस्थिती स्पर्धात्मक, संघर्षमय आणि तंत्रज्ञानाधिष्ठित झाली आहे. जगात अस्वस्थता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत भारतानं स्वतंत्र भूमिका घेणं आवश्यक असल्याचं मत सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. लष्कराच्या दक्षिण विभागातर्फे आयोजित जय से विजय या चर्चासत्रात बीजभाषण करताना ते बोलत होते. यावेळी लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ उपस्थित होते. जगातील बदलत्या परिस्थितीच्या अनुषंगानं भविष्यात संरक्षण क्षेत्रामध्ये संयुक्त प्रयत्न, आत्मनिर्भरता आणि संशोधन यांची आवश्यकता असल्याचं जनरल चौहान म्हणाले.

**प्रोमो**

***आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागात हंगामी वृत्त निवेदक आणि भाषांतरकार, या पदासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असलेल्या 21 ते 50 या वयोगटातील व्यक्ती या पदासाठी अर्ज करू शकतात. पत्रकारितेची पदव्युत्तर पदविका किंवा 5 वर्षांचा मुद्रित अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य असेल. ही नियुक्ती आवश्यकतेनुसार फक्त हंगामी तत्वावर असेल. सविस्तर माहिती आणि विहीत नमुन्याचा अर्ज भरण्यासाठी....***

***newsonair.gov.in/vacancies***

***prasarbharati.gov.in/pbvacancies या संकेतस्थळांना भेट द्यावी***

***अधिक माहितीसाठी : 020-25510506 या दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा.***

***अर्ज करण्याची अंतिम तारीख: 25 फेब्रुवारी 2026***

**आयुष विकास महाएक्स्पो**

'आयुष-विकसित भारत महावर्ल्ड एक्स्पो 2026'चं 18 ते 20 फेब्रुवारी दरम्यान पुण्यात आयोजन करण्यात आलं आहे. महाराष्ट्र शासनाचं आयुष संचालनालय, ट्रिनिटी ग्रुप आणि चेंबर फॉर इम्पोर्ट, एक्स्पोर्ट अँड हेल्थ यांच्याद्वारे संयुक्तपणे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आलं असल्याची माहिती संयोजक डॉक्टर जोसेफ डायस यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. 'विकसित भारत' या व्यापक संकल्पनेनुसार स्वदेशी आरोग्य पद्धती, शाश्वत जीवनशैली आणि व्यापार संधी यांचा प्रसार करणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे, असं डायस यांनी यावेळी सांगितलं.

**<u>विद्यार्थी-इस्रोभेट</u>**

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'विज्ञान प्रेरणा अभियान' अंतर्गत विमुक्त जाती भटक्या जमातींच्या आश्रमशाळांमधील 100 गुणवंत विद्यार्थ्यांची, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या भेटीसाठी निवड करण्यात आली आहे. 15 ते 20 फेब्रुवारी दरम्यान या विशेष शैक्षणिक विज्ञान सहलीचं आयोजन करण्यात आलं असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी काल मुंबईत दिली.

**<u>पुरस्कार</u>**

सन 2024 साठी मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार काल राज्य शासनातर्फे जाहीर करण्यात आले. प्रौढ वाङ्मय, बाल वाङ्मय, प्रथम प्रकाशन आणि सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार अशा चार प्रकारांमध्ये एकंदर 35 पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**<u>दृष्टीहिन</u>**

नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ द ब्लाइंडतर्फे आयोजित राज्यस्तरीय दृष्टिहीन क्रिकेट स्पर्धेत विदर्भानं अटीतटीच्या 'सुपर ओव्हर'मध्ये पुण्यावर मात करून विजेतेपद पटकावलं. पुणे संघानं प्रथम फलंदाजी करताना 10 षटकांत 117 धावा केल्या. विदर्भाच्याही 117 धावा झाल्यामुळं सुपर ओव्हरमध्ये विदर्भानं 15 धावा केल्या आणि पुण्याच्या संघाला रोखून धरत विजय मिळवला.

**<u>क्रिकेट</u>**

वीस षटकांच्या सामन्यांच्या, पुरुषांच्या विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल रात्री चेन्नई इथं अमेरिकेनं नेदरलँड्सचा 93 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना अमेरिकेनं निर्धारित 20 षटकांत 6 बाद 196 धावा केल्या. नेदरलँड्सचा संपूर्ण संघ 16 व्या षटकात 103 धावांत बाद झाला. दिल्लीत झालेल्या सामन्यात संयुक्त अरब अमिरातीनं कॅनडाचा 5 गडी राखून पराभव केला, तर कोलंबोमध्ये झालेल्या रोमांचक सामन्यात झिम्बावेनं ऑस्ट्रेलियाचा 23 धावांनी पराभव केला.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागांत हवामान कोरडं राहील. कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.